# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४

---

क्र.कोविमं/ए-१ गोपनीय/प्रा.प./2599
कोल्हापूर-४१६ ००४
दिनांक - ०५.०२.२०२२

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर.

**विषय :- कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर आयोजित माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा मार्च-एप्रिल २०२२ च्या प्रात्यक्षिक परीक्षेसंदर्भात मार्गदर्शक सूचना व विषयनिहाय सुधारित नियोजनाबाबत**

**संदर्भ :- १. क्र.रा.मं./परीक्षा-६/७०७२ दिनांक २०.१२.२०२१ चे पत्र.**
**२. क्र.रा.मं./परीक्षा-२/६०४ दिनांक ०३.०२.२०२२ चे पत्र.**

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र मार्च-एप्रिल २०२२ ची लेखी/प्रात्यक्षिक परीक्षा घेण्याबाबतचे परीक्षा वेळापत्रक संदर्भिय पत्र क्रमांक १. नुसार यापूर्वीच कळविण्यात आलेले आहे.

संदर्भिय पत्र क्रमांक २. नुसार कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर प्रात्यक्षिक/श्रेणी/तोंडी व अंतर्गत मूल्यमापन इत्यादी परीक्षा घेण्याबाबतच्या विषेश मार्गदर्शक सूचना व विषयनिहाय सुधारित नियोजन प्राप्त झाले असून सदरच्या संपूर्ण सूचना या पत्रासोबत मंडळाच्या संकेत स्थळावर (www.sscboardkolhapur.in) प्रसारित करण्यात येत आहेत. त्याप्रमाणे सर्व मुख्याध्यापकांनी व शाळा प्रमुखांनी नियोजन करावे तसेच विशेष मार्गदर्शक सूचनांची काटेकोर अंमलबजावणी होईल याबाबत दक्षता घेण्यात यावी.

सदरच्या परीक्षेचे गोपनीय साहित्य कशाप्रकारे व कोणत्या तारखेस जिल्हा वितरण केंद्रावरुन स्विकारावे व जमा करावयाचे याची माहिती कोल्हापूर विभागीय मंडळाच्या संकेत स्थळावर (www.sscboardkolhapur.in) प्रसारित करण्यात येईल याचीही नोंद घ्यावी.

(एस.डी.सोनवणे)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind
Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेज
आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर
पुणे ४११००४

Email : secretary.stateboard@gmail.com
Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Secretary(P) : 25651750

महत्वाचे/तातडीचे/परीक्षा प्राधान्य

रा.मं./परीक्षा-२/ ६०४
पुणे - ४११००४
दिनांक -३/२/२०२२

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

विषय:-कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर आयोजित माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा मार्च-एप्रिल २०२२ च्या प्रात्यक्षिक परीक्षेसंदर्भात मार्गदर्शक सूचना व विषयनिहाय सुधारित नियोजनाबाबत

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत मार्च-एप्रिल २०२२ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा अंतर्गत लेखी परीक्षा दिनांक १५/३/२०२२ ते ०४/४/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. तसेच इ.१० वी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन दिनांक २५/२/२०२२ ते दिनांक १४/३/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

तसेच मंडळाने उपरोक्तप्रमाणे निर्धारित केलेल्या कालावधीत विद्यार्थी कोरोनाबाधित झाल्यामुळे अथवा अन्य वैद्यकीय/अपरिहार्य कारणांमुळे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन देऊ न शकल्यास अशा विद्यार्थ्यांची सदर परीक्षा लेखी परीक्षेनंतर दि.०५/४/२०२२ ते दि.२२/४/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात यावी. **Out of Turn** चा कालावधी उपरोक्त कालावधीतच समाविष्ट असेल त्यामुळे **Out of Turn** साठी स्वतंत्र कालावधी देण्यात येणार नाही. या कालावधीतील परीक्षांसाठी कोणतेही वेगळे शुल्क आकारण्यात येऊ नये.

उपरोक्त प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा,अंतर्गत मूल्यमापन यासाठी प्रविष्ट होणाऱ्या परीक्षार्थ्यांसाठी व अन्य घटकांसाठी कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विशेष मार्गदर्शक सूचना व विषयनिहाय सुधारित नियोजन मंडळामार्फत निश्चित करण्यात आलेले आहे. सदर सूचना व विषयनिहाय सुधारित नियोजन पत्रासोबत जोडण्यात येत असून त्या विभागीय मंडळस्तरावरुन सर्व माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापक यांच्यामार्फत सर्व परीक्षार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात. विशेष मार्गदर्शक सूचनांची काटेकोर अंमलबजावणी होईल याबाबत दक्षता घेण्यात यावी.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४
माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा मार्च-एप्रिल २०२२
प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन
कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर
विशेष मार्गदर्शक सूचना

१. अ) कोविड-१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर इ. १० वी ची प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन इत्यादी परीक्षा प्रचलित पध्दतीप्रमाणे तसेच यासंदर्भात मंडळामार्फत देण्यात आलेल्या विशेष सूचना विचारात घेवून आयोजित करण्यात येतील. सदर परीक्षा दिनांक २५/०२/२०२२ ते दिनांक १४/०३/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात येतील. प्रयोगवही (जर्नल) उपरोक्त कालावधीत सादर करावे.

**महत्वाचे-** मंडळाने उपरोक्तप्रमाणे निर्धारित केलेल्या कालावधीत विद्यार्थी कोरोनाबाधित झाल्यामुळे अथवा अन्य वैद्यकीय/अपरिहार्य कारणांमुळे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन इ. परीक्षा देऊ न शकल्यास अशा विद्यार्थ्यांची सदर परीक्षा लेखी परीक्षेनंतर दि.०५/०४/२०२२ ते दिनांक २२/०४/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात यावी. Out of Turn चा कालावधी उपरोक्त कालावधीतच समाविष्ट असेल. त्यामुळे Out of Turn साठी स्वतंत्र कालावधी देण्यात येणार नाही.

ब) इ. १० वी ची प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन इत्यादी परीक्षा घेण्याची जबाबदारी संबंधित माध्यमिक शाळांना देण्यात येत आहे. त्यामुळे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन इत्यादी परीक्षा प्रचलित मूल्यमापन आराखडयानुसार तसेच कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाची परिस्थिती विचारात घेऊन निर्धारित कालावधीत पार पाडावी.

२. कोविड-१९ विषाणूची पार्श्वभूमी विचारात घेता बहुतांश माध्यमिक शाळा विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीसह सुरू ठेवण्यास कमी कालावधी मिळाल्याने निर्धारित प्रात्यक्षिके पूर्ण करणे शक्य झाले नाही. सदर बाब विचारात घेऊन माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेतर्गत अंतर्गत मूल्यमापन असलेल्या सर्व विषयांच्या परीक्षेबाबत खालीलप्रमाणे नियोजन करण्यात आलेले आहे.

अ) कोविड-१९ विषाणूची पार्श्वभूमी विचारात घेऊन विज्ञान व तंत्रज्ञान तसेच अन्य प्रात्यक्षिक असलेल्या विषयांसाठी यावर्षासाठी निर्धारित केलेल्या / किमान ४०% प्रात्यक्षिकांचा सराव घेण्यात यावा. तसेच मंडळाने दिलेल्या सूचना विचारात घेवून प्रात्यक्षिक / गृहपाठ, प्रात्यक्षिक वही व प्रकल्प यासाठी गुणदान करावे.

ब) या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी अंतर्गत व बहिस्थ परिक्षक संबंधित माध्यमिक शाळेतूनच घेण्यात यावेत. ज्या शाळेत एका विषयासाठी एकापेक्षा अधिक विषय शिक्षक उपलब्ध नाहीत तेथे त्याच उपलब्ध विषय शिक्षकाने अंतर्गत व बहिस्थ परिक्षकाचे काम करावे.

३. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्यशिक्षण आणि शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षा हया प्रत्यक्ष प्रात्यक्षिक परीक्षा/ प्रात्यक्षिकांवर आधारित बहुपर्यायी प्रश्नरूपी चाचणीद्वारे मूल्यमापन या स्वरूपात घेण्यात येतील.

४. माध्यमिक शाळेतील सर्व संबंधीतांनी कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या अनुषंगाने शासनाच्या व आरोग्य विभागाच्या सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

५. उपरोक्त कालावधीत माध्यमिक शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व सॅनिटायझरची व्यवस्था करण्यात यावी. याशिवाय, अधिक सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी शाळेत येताना स्वत:ची पाण्याची बाटली व सॅनिटायझर सोबत ठेवावे. तसेच मास्क व लेखन साहित्य (उदा-पेन, पेन्सिल, कंपास इ.) सुध्दा स्वत:सोबत आणावे.

६. कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावासंदर्भातील सूचनांचे पालन करण्याच्या दृष्टिने उपलब्ध जागेचा विचार करून कमी विद्यार्थी संख्येच्या बॅचेस तयार कराव्यात.

७. विद्यार्थ्यांना व अन्य घटकांना शाळेत प्रवेश देताना त्यांचे तापमान मोजण्यात यावे तसेच शाळेतील संपूर्ण कालावधीत विद्यार्थी व सर्व संबंधितांनी मास्क वापरणे अनिवार्य राहील.

८. शाळेमध्ये कोणत्याही प्रकारे गर्दी होणार नाही व शारीरिक अंतर राखले जाईल याची दक्षता घ्यावी. आरोग्यविषयक सर्व सूचनांचे पालन करावे.

९. प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळी परीक्षा दालनात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य ती काळजी घ्यावी.

----------------------****--------------------------

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
## माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा मार्च–२०२२

विज्ञान आणि तंत्रज्ञान, गणित, सामाजिक शास्त्रे (इतिहास व राज्यशास्त्र, भूगोल) NSQF अंतर्गत व्यावसायिक विषय व पूर्व व्यावसायिक विषय, दिव्यांगांसाठी असलेले कार्यशिक्षण व शरीरशास्त्र,आरोग्यशास्त्र, गृहशास्त्र, आरोग्य शारीरिक शिक्षण विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षांबाबत विषयनिहाय नियोजन

## १) विज्ञान आणि तंत्रज्ञान

- विज्ञान प्रात्यक्षिक परीक्षा यावर्षी ऑफलाईन होणार आहेत.
- प्रात्यक्षिक परीक्षेसाठी असलेले अंतर्गत २० गुण शालेय स्तरावर संबंधित विषय शिक्षक खालीलप्रमाणे देतील.

| | | विज्ञान भाग १ | विज्ञान भाग २ |
|---|---|---|---|
| १. | प्रकल्प | २ गुण | २ गुण |
| २. | प्रात्यक्षिक वही | २ गुण | २ गुण |
| ३. | प्रात्यक्षिक/गृहपाठ | ६ गुण | ६ गुण |
| | एकूण | १० गुण | १० गुण = २० गुण |

**टीप:–१) प्रकल्प:–** विज्ञान भाग १ आणि भाग २ साठी प्रत्येकी एका विषयावर प्रकल्प करावा. प्रकल्पाचा विषय पाठ्यपुस्तकावर आधारित असावा.

२) **प्रात्यक्षिक वही:** – बालभारतीने प्रकाशित केलेल्या प्रात्यक्षिक वहीतील विज्ञान भाग १ साठी कोणतीही किमान ५ प्रात्यक्षिके आणि विज्ञान भाग २ साठी कोणतीही किमान ५ प्रात्यक्षिके वहीत लिहून घ्यावीत.

३) **प्रात्यक्षिक/गृहपाठ**

अ) Covid-19 विषाणूची परिस्थिती नियंत्रित राहिल्यास मूळ मूल्यमापन आराखडयानुसार प्रात्यक्षिक परीक्षा आयोजित करून पुढीलप्रमाणे गुणदान करावे.

प्रात्यक्षिक परीक्षेसाठी विज्ञान भाग १ आणि विज्ञान भाग २ साठी प्रत्येकी एक प्रयोग परीक्षेसाठी देणे अपेक्षित आहे. त्यासाठी गुणविभागणी खालीलप्रमाणे असावी.

| | | विज्ञान भाग १ | विज्ञान भाग २ |
|---|---|---|---|
| i | प्रयोगाची कार्यपध्दती | ०३ गुण | ०३ गुण |
| ii | पुरेशी निरीक्षणे घेणे | ०२ गुण | ०२ गुण |
| iii | अनुमान/निष्कर्ष काढणे | ०१ गुण | ०१ गुण |
| | एकूण | ०६ गुण | ०६ गुण |

ब) Covid-19 च्या प्रादुर्भावामुळे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक परीक्षा आयोजन करणे शक्य न झाल्यास विज्ञान १ आणि भाग २ साठी प्रत्येकी एक गृहपाठ लिहून घेणे. पाठयपुस्तक आणि प्रात्यक्षिक वही यातील विषयांचा अंतर्भाव गृहपाठामध्ये करावा.

गृहपाठासाठी विषय निवडताना खालील उदाहरणांचा मार्गदर्शक म्हणून विचार करावा.

विज्ञान भाग १ : - १) रासायनिक अभिक्रियांचे प्रकार
२) प्रकाशाचे अपवर्तन - काचेच्या चिपेचा प्रयोग
३) प्रिझमच्या साहाय्याने होणारे प्रकाशाचे अपस्करण
४) बहिर्वक्र भिंगाचे नाभीय अंतर
५) होपचे उपकरण (पाण्याचे असंगत आचरण)

विज्ञान भाग २ : - १) फुलांची रचना
२) सूत्री विभाजन, अर्धसूत्री विभाजन
३) मानवी प्रजनन संस्था
४) जैविक खते
५) प्राणी वर्गीकरण

**सूचना-** **प्रकल्प, प्रात्यक्षिक वही आणि गृहपाठ लिखित स्वरुपात शाळेत जमा करून घ्यावे. शाळेने या नोंदी जतन करून ठेवाव्यात.**

# माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा सन २०२१-२२

## विषय- गणित

## गणित भाग १ (बीजगणित) व भाग २(भूमिती)

| | | |
|---|---|---|
| लेखी परीक्षा- | गणित भाग १ (बीजगणित)- | ४० गुण |
| | गणित भाग २ (भूमिती) - | ४० गुण |
| अंतर्गत मूल्यमापन | | २० गुण |
| | एकूण गुण | १०० गुण |

**अंतर्गत मूल्यमापनाच्या २० गुणांची विभागणी**

| गृहपाठ | (MCQ) बहुपर्यायी प्रश्नरुपी चाचणी - (प्रात्यक्षिक परीक्षेऐवजी) |
|---|---|
| गृहपाठ- गणित भाग १ - ५ गुण<br>गृहपाठ- गणित भाग २ - ५ गुण<br>१० गुण<br><br>टीप - गणित भाग १ मधील कोणत्याही ५ कृती किंवा ५ मोठी उदाहरणे सोडवून घ्यावीत. त्यांना योग्य ते गुण देऊन त्याचे रुपांतर ५ गुणात करावे. त्याचप्रमाणे गणित भाग २ मधील ५ कृती किंवा ५ मोठी उदाहरणे सोडवून घ्यावीत व त्यांना दिलेल्या गुणांचे रुपांतर ५ गुणात करुन गृहपाठासाठी १० पैकी गुणांची नोंद करावी.<br><br>गृहपाठ-१० गुण | (MCQ) गणित भाग १ - ५ गुण<br>(MCQ) गणित भाग २ - ५ गुण<br>१० गुण<br><br>टीप - वगळलेल्या अभ्यासक्रमाचा विचार करुन गणित भाग १ व गणित भाग २ मधील घटकांवर प्रत्येकी १० गुणांचे १० बहुपर्यायी प्रश्न देऊन विद्यार्थ्यांची शाळेत चाचणी घेण्यात यावी किंवा घरी लेखन कार्य म्हणून सोडविण्यास देण्यात यावी. त्यात मिळालेल्या गुणांचे भाग १ साठी ५ गुणांमध्ये व भाग २ साठी ५ गुणांमध्ये रुपांतर करुन १० पैकी गुणांची नोंद करावी.<br><br>बहुपर्यायी चाचणी -१० गुण |

**अंतर्गत मूल्यमापन = गृहपाठ १० गुण + बहुपर्यायी प्रश्नरुपी चाचणी १० गुण =एकूण २० गुण**

**सूचनाः- गृहपाठ व बहुपर्यायी प्रश्नरुपी चाचणी यांच्या लेखी नोंदी जतन करुन ठेवाव्यात.**

# माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) सन २०२२

## सामाजिक शास्त्रे भाग-१ (इतिहास व राज्यशास्त्र)

| | | |
|---|---|---|
| लेखी परीक्षा- | ४० गुण | (२८ गुण इतिहास + १२ गुण राज्यशास्त्र) |
| अंतर्गत गुण | १० गुण | |
| | ------ | |
| एकूण गुण | ५० गुण | |
| | ------ | |

अंतर्गत गुणांची विभागणी - गृहपाठ- ०५ गुण
बहुपर्यायी चाचणी- ०५ गुण

सूचना:-

* गृहपाठ विकसित करताना वगळलेला अभ्यासक्रम लक्षात (कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाची परिस्थिती लक्षात घेऊन शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी वगळलेला अभ्यासक्रम) घेऊन शालेय स्तरावर शिक्षकांनी गृहपाठाचे प्रश्न विकसित करावेत. गृहपाठ जमा करून घेऊन शालेय स्तरावर त्यांची तपासणी करून ५ पैकी गुण गृहपाठासाठी द्यावेत. संबंधित नोंदी शाळेत जतन करून ठेवाव्यात.

* बहुपर्यायी चाचणी- प्रत्येकी चार पर्याय असलेले आठ वस्तुनिष्ठ प्रश्न इतिहासावर व दोन प्रश्न राज्यशास्त्रावर विचारावेत. या दहा गुणांचे रूपांतर पाच गुणांमध्ये करावे. ही बहुपर्यायी परीक्षा शाळेत/गृहपाठ स्वरूपात घ्यावी.

* अंतर्गत मूल्यमापनासाठीचे कार्य (गृहपाठ व बहुपर्यायी परीक्षा) शाळेत जमा करून घेऊन शाळेत या नोंदी जतन कराव्यात.

# माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) सन २०२२

## सामाजिक शास्त्रे भाग-२ (भूगोल)

सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील कोविड-१९ विषाणू प्रादूर्भावाच्या परिस्थितीचा विचार करता इयत्ता १० वी भूगोल विषयाचे अंतर्गत मूल्यमापन पुढीलप्रमाणे करता येऊ शकेल.

१) स्वाध्याय - ०५ गुण

२) नकाशावर आधारित कृती किंवा - ०५ गुण
आकृत्या / आलेख काढणे.
(ही कृती घरी/वर्गात सोयीनुसार पाठयपुस्तक, नकाशासंग्रह इ.मदतीने पूर्ण करता येऊ शकेल.)

------

एकूण गुण १० गुण

------

वरील मूल्यमापन हे अंतर्गत मूल्यमापनाच्या आराखडयाशी सुसंगत घटकांनुसार आहे.

सूचना-

१) **स्वाध्यायाबाबत-**
स्वाध्यायावरील गृहपाठ देताना कोणत्याही एका घटकावर आधारीत एक प्रश्न देणे. ( उच्चस्तरीय बोधात्मक मुक्तोत्तरी प्रश्न असावा) तो विद्यार्थ्यांने घरून विश्वकोष, अंतर्जाल, मासिके इ.संदर्भ साहित्याचा वापर करून सोडवावा.

२) नकाशा, आलेख व आकृत्या मिळून कोणत्याही ५ कृती पूर्ण केल्यास तेही ग्राहय धरण्यात यावे. ( उदा-एखादा विद्यार्थी ५ नकाशे किंवा ५ आकृत्या किंवा ५ आलेख देईल, तर दुसरा विद्यार्थी २ नकाशे, २ आकृत्या व १ आलेख याप्रमाणे ५ कृती पूर्ण करू शकेल. याप्रमाणे कृती मध्ये अदलाबदल करता येऊ शकेल.)

* अंतर्गत मूल्यमापनासाठीचे कार्य शाळेत जमा करून घेऊन शाळेने या नोंदी जतन कराव्यात.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

## माध्यमिक शालांत प्रमाणपत्र ( इ.१० वी) परीक्षा मार्च २०२२
## एन.एस.क्यू.एफ. अंतर्गत व्यवसाय शिक्षण विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षा
## विषय (एक्स-१ ते एक्स-४, एक्स-६ ते एक्स-९ व ९५, ९७ आणि ९८ )

१) व्यवसाय शिक्षण अंतर्गत विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा, प्रचलित पध्दतीने घेण्यात याव्यात. मात्र कोविड १९ विषाणूंचा प्रादुर्भाव विचारात घेवुन प्रात्यक्षिक परीक्षांचे नियोजन खालीलप्रमाणे करावे.

| नियमित मुल्यांकन पध्दत | प्रात्यक्षिक परीक्षा मार्च - २०२२ साठी मुल्यांकन पध्दत |
|---|---|
| • लेखी परीक्षा ८० गुणांचे रुपांतर प्रचलित पध्दतीने ३० गुणामध्ये | • लेखी परीक्षा ८० गुणांचे रुपांतर प्रचलित पध्दतीने ३० गुणामध्ये |
| • प्रात्यक्षिक परीक्षा - ५० गुण<br>➢ प्रात्यक्षिक- ३० गुण<br>➢ तोंडी परीक्षा- १० गुण<br>➢ निरीक्षण- १० गुण<br>---<br>➢ प्रात्याक्षिक परीक्षा ५० गुण<br>---<br>• अंतर्गत गुण खालीलप्रमाणे-<br>• टर्म वर्क - १० गुण<br>• प्रकल्प- १० गुण<br>• ---<br>• अंतर्गत - २० गुण<br>---<br>प्रात्यक्षिक + अंतर्गत=७० गुण<br>---<br>एकूण गुण (लेखी + प्रात्यक्षिक)-१०० गुण | प्रात्यक्षिक/ गृहपाठ<br>अ. कोविड-१९ विषाणूची परिस्थिती नियंत्रित राहिल्यास मूळ मूल्यमापन आराखड्यानुसार निर्धारित प्रात्यक्षिकांपैकी किमान ६ प्रात्यक्षिकांचा सराव घेऊन त्यावर प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात यावी.<br>ब. १) कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे प्रत्यक्ष परीक्षा आयोजित करणे शक्य न झाल्यास प्रात्याक्षिकावर आधारित ३० गुणांची बहुपर्यायी १५ प्रश्नांची प्रश्नपत्रिका शालेय स्तरावर तयार करून विद्यार्थ्यांची चाचणी घेण्यात यावी.<br>२) दिलेल्या प्रात्यक्षिकावर आधारित २ गृहपाठ - २० गुण<br>३) प्रात्यक्षिकावर आधारित विशेष लेखन कार्य - ३० गुण<br>प्रात्याक्षिक परीक्षा ५० गुण<br>अंतर्गत गुण खालीलप्रमाणे:<br>• टर्म वर्क - १० गुण<br>• प्रकल्प- १० गुण<br>---<br>अंतर्गत - २० गुण<br>---<br>प्रात्यक्षिक + अंतर्गत=७० गुण<br>---<br>एकूण गुण (लेखी + प्रात्यक्षिक)-१०० गुण |

२) NSQF अंतर्गत मान्यताप्राप्त विषय (एक्स-१ ते एक्स-४, एक्स-६ ते एक्स-९ व ९५,९७ आणि ९८ )प्रात्यक्षिक परीक्षा मार्च २०२२ साठी शालेय स्तरावर अंतर्गत परीक्षकाची नियुक्ती करण्यात यावी. बहिस्थ परीक्षक सेक्टर स्किल मार्फत नियुक्त केले जातील.

३) विद्यार्थ्यांनी जमा केलेले टर्म वर्क, प्रकल्प,प्रात्याक्षिक तपासणी करून ते नोंदीसह शालेय दप्तरी जतन करून ठेवावे.

४) विद्यार्थीनिहाय टर्म वर्क ,प्रकल्प व प्रात्यक्षिक इत्यादीची तपासणी करून त्याच्या गुणांच्या नोंदी मंडळाने पुरविलेल्या गुणपत्रिकेत (OMR SHEET) करावी.

५) पुनर्परीक्षार्थींसाठी देखील निर्धारित विषयांच्या प्रात्यक्षिकाबाबत वरील प्रमाणे कार्यवाही करावी. (एक्स-१ ते एक्स-४, एक्स-६ ते एक्स-९ व ९५, ९७ आणि ९८ )

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

## माध्यमिक शालांत प्रमाणपत्र ( इ.१० वी)परीक्षा मार्च - २०२२
## एन.एस.क्यू.एफ. अंतर्गत व्यवसाय शिक्षण विषयाच्या
## (एक्स-१,९१,९२ व ९३) प्रात्यक्षिक परीक्षा

१) व्यवसाय शिक्षण अंतर्गत विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा, प्रचलित पध्दतीने घेण्यात याव्यात. मात्र कोविड १९ विषाणूचा प्रादुर्भाव विचारात घेवुन प्रात्यक्षिक परीक्षांचे नियोजन खालीलप्रमाणे करावे.

| नियमित मुल्यांकन पध्दत | प्रात्यक्षिक परीक्षा मार्च - २०२२ साठी मुल्यांकन पध्दत |
|---|---|
| • लेखी परीक्षा ८० गुणांचे रुपांतर प्रचलित पध्दतीने ३० गुणामध्ये | • लेखी परीक्षा ८० गुणांचे रुपांतर प्रचलित पध्दतीने ३० गुणामध्ये |
| • प्रात्यक्षिक परीक्षा - ५० गुण<br>➢ प्रात्यक्षिक- ३० गुण<br>➢ तोंडी परीक्षा- १० गुण<br>➢ निरीक्षण- १० गुण<br>➢ प्रात्याक्षिक परीक्षा ५० गुण<br>---<br>• अंतर्गत गुण खालीलप्रमाणे-<br>• टर्म वर्क - १० गुण<br>• प्रकल्प- १० गुण<br>• ---<br>• अंतर्गत - २० गुण<br>---<br>प्रात्यक्षिक + अंतर्गत=७० गुण<br>---<br>एकूण गुण (लेखी + प्रात्यक्षिक)-१०० गुण | प्रात्यक्षिक/ गृहपाठ<br>अ. कोविड-१९ विषाणूची परिस्थिती नियंत्रित राहिल्यास मूळ मूल्यमापन आराखड्यातुसार निर्धारित प्रात्यक्षिकांपैकी किमान ६ प्रात्यक्षिकांचा सराव घेऊन त्यावर प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात यावी.<br><br>ब. १) कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे प्रत्यक्ष परीक्षा आयोजित करणे शक्य न झाल्यास प्रात्याक्षिकावर आधारित ३० गुणांची बहुपर्यायी १५ प्रश्नांची प्रश्नपत्रिका शालेय स्तरावर तयार करून विद्यार्थ्यांची चाचणी घेण्यात यावी.<br><br>२) दिलेल्या प्रात्यक्षिकावर आधारित २ गृहपाठ - २० गुण<br>३) प्रात्यक्षिकावर आधारित विशेष लेखन कार्य - ३० गुण<br>प्रात्याक्षिक परीक्षा ५० गुण<br><br>अंतर्गत गुण खालीलप्रमाणे:<br>• टर्म वर्क - १० गुण<br>• प्रकल्प- १० गुण<br>---<br>अंतर्गत - २० गुण<br>---<br>प्रात्यक्षिक + अंतर्गत=७० गुण<br>---<br>एकूण गुण (लेखी + प्रात्यक्षिक)-१०० गुण |

२) NSQF व्यवसाय शिक्षण संचालनालया अंतर्गत मान्यताप्राप्त विषयांची (एक्स-१,९१,९२ व ९३) प्रात्यक्षिक परीक्षा मार्च -एप्रिल-२०२२ साठी शालेय स्तरावर अंतर्गत परीक्षकाची नियुक्ती करण्यात यावी. बहिस्थ परीक्षक व्यवसाय शिक्षण संचालनालया मार्फत नियुक्त केले जातील.

३) विद्यार्थ्यांने जमा केलेले प्रात्यक्षिक जॉब,टर्म वर्क, प्रकल्प इत्यादीची तपासणी करून ते नोंदीसह शालेय दप्तरी जतन करून ठेवावे.

४) विद्यार्थीनिहाय टर्म वर्क, प्रकल्प, गृहपाठ व प्रात्यक्षिक वर आधारित विशेष लेखन कार्य तपासणी करून त्याचे गुणांच्या नोंदी मंडळाने पुरविलेल्या गुणपत्रिकेत (OMR SHEET) करावी.

५) पुनर्परीक्षार्थींसाठी देखील निर्धारित विषयांच्या प्रात्यक्षिकाबाबत वरील प्रमाणे कार्यवाही करावी. (विषय-एक्स१,९१,९२ व ९३)

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

## माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा मार्च-एप्रिल २०२२

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असलेले गृहशास्त्र, शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व कार्यशिक्षण विषयांतर्गतचे नऊ विषय यासाठी प्रात्यक्षिक परीक्षा/ प्रात्यक्षिकांवर आधारीत बहुपर्यायी प्रश्नरुपी चाचणी

| १ | कार्यशिक्षण विषयांतर्गतचे(१) घरगुती विद्युत उपकरणे (J-1), (२) दूध व दुधाचे पदार्थ (J-5), (३) हस्तभरतकाम (J-9), (४) शिवण यंत्राव्दारे शिलाई व शिवणयंत्राची निगा व दुरुस्ती (K-1), (५) टाकाऊ वस्तूंपासून सौंदर्याकृती (K-5), (६) पाककला (L-7), (७) भारतीय संगीत (M-3), (८) चित्रकला व रंगकाम (M-6), (९) कागदकाम, पुठ्ठाकाम आणि पुस्तकबांधणी (M-7) हे विषय. |
|---|---|

| नियमित मूल्यांकन पद्धत | मार्च-एप्रिल २०२२ साठी मूल्यांकन पद्धत |
|---|---|
| • लेखी परीक्षा- प्रचलित पद्धती प्रमाणे २५ गुणांची राहिल.<br>• अंतर्गत गुण खालीलप्रमाणे<br>अ)जर्नल वही + वर्षभरातील काम = २५ गुण<br>ब)प्रात्यक्षिक परीक्षा = ५० गुण | • लेखी परीक्षा- प्रचलित पध्दती प्रमाणे २५ गुणांची राहिल.<br>• अंतर्गत गुण खालीलप्रमाणे<br>अ)जर्नल वही + वर्षभरातील काम = २५ गुण<br>ब)निर्धारित एकूण प्रात्यक्षिकांपैकी किमान ४०% प्रात्यक्षिकांचा सराव घ्यावा. त्यावर प्रात्यक्षिक परीक्षा/प्रात्यक्षिकांवर आधारित २५ प्रश्नांची बहुपर्यायी प्रश्नपत्रिका शालेय स्तरावर करून घ्यावी. प्रत्येक प्रश्नास २ गुण द्यावेत. ५० गुणांची ही लेखी प्रश्नपत्रिका असेल. |
| • गुणविभागणी<br>• लेखी परीक्षा- २५ गुण<br>• जर्नल वही + वर्षभरातील काम - २५ गुण<br>• प्रात्यक्षिक परीक्षा- ५० गुण<br>१०० गुण | • गुणविभागणी<br>• लेखी परीक्षा- २५ गुण<br>• जर्नल वही+ वर्षभरातील काम - २५ गुण<br>• प्रात्यक्षिक परीक्षा/प्रात्यक्षिकावर आधारित बहुपर्यायी प्रश्नरुपी चाचणी परीक्षा ५० गुण<br>१०० गुण |

| २ | गृहशास्त्र, शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र |
|---|---|

| नियमित मूल्यांकन पद्धत | २०२१-२२ साठी मूल्यांकन पद्धत |
|---|---|
| • लेखी परीक्षा<br>प्रचलित पध्दती प्रमाणे ६० गुण | • लेखी परीक्षा<br>प्रचलित पद्धतीप्रमाणे लेखी परीक्षा ६० गुणांची राहिल.<br>विभाग अ गृहशास्त्र - २५ गुण<br>विभाग ब शरीरशास्त्र - २० गुण<br>आरोग्यशास्त्र-१५ गुण<br>एकूण गुण -६० गुण |

| | |
|---|---|
| • अंतर्गत गुण<br>अ) वार्षिक काम -२० गुण<br><br>ब) प्रात्यक्षिक परीक्षा-२० गुण | अ) 'अ' विभाग-गृहशास्त्र व<br>'ब' विभाग-शरीरशास्त्र व आरोग्यशास्त्र यांची कार्यपुस्तिका/प्रात्यक्षिकाची जर्नल वही-२० गुण<br>ब)निर्धारित एकूण प्रात्यक्षिकांपैकी किमान ४०% प्रात्यक्षिकांचा सराव घ्यावा. त्यावर प्रात्यक्षिक परीक्षा /प्रात्यक्षिकांवर आधारित १० प्रश्नांची बहुपर्यायी प्रश्नपत्रिका शालेय स्तरावर करून घ्यावी. प्रत्येक प्रश्नास २ गुण द्यावेत. २० गुणांची ही लेखी प्रश्नपत्रिका असेल (गृहशास्त्र -१० गुण, शरीरशास्त्र व आरोग्यशास्त्र -१० गुण) |
| • गुणविभागणी<br>• लेखी परीक्षा- ६० गुण<br>• वार्षिक काम २० गुण<br>• प्रात्यक्षिक परीक्षा २० गुण<br>एकूण १०० गुण | • गुणविभागणी<br>• लेखी परीक्षा- ६० गुण<br>• जर्नल वही+ वर्षभरातील काम - २० गुण<br>• प्रात्यक्षिक परीक्षा/प्रात्यक्षिकावर आधारित बहुपर्यायी प्रश्नरुपी चाचणी परीक्षा २० गुण<br><br>एकूण १०० गुण |

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

## माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा मार्च २०२२

## आरोग्य व शारीरिक शिक्षण

विद्यार्थ्यांसाठी असलेले आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाचे किमान एका सत्राचे मूल्यांकन करण्यात यावे. प्रात्यक्षिक व लेखन कार्य प्रत्येकी ५० गुणांची परीक्षा घेऊन मिळालेल्या १०० गुणांपैकी प्रचलित पद्धतीनुसार श्रेणी देण्यात यावी.

सदर विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा व लेखन कार्य इ. घेण्याचे स्वातंत्र्य संबंधित माध्यमिक शाळांना राहिल. त्यामुळे सदर परीक्षेचे शालेय स्तरावर आयोजन करुन त्याचे मूल्यांकन विभागीय मंडळाकडे जमा करावे.

<table>
<tr><th colspan="5">नियमित मूल्यांकन पध्दत</th><th colspan="4">मार्च २०२२ साठी मूल्यांकन पध्दत</th></tr>
<tr><td colspan="5">प्रथम सत्र<br>प्रात्यक्षिक कार्य = ५० गुण<br>लेखन कार्य = ५० गुण<br><br>द्वितीय सत्र<br>प्रात्यक्षिक कार्य = ५० गुण<br>व लेखन कार्य = ५० गुण<br>याप्रमाणे परीक्षा घेऊन</td><td colspan="4">एकाच सत्रात<br>खालीप्रमाणे परीक्षा घेऊन मिळालेल्या प्राप्त गुणांनुसार श्रेणी देण्यात यावी.</td></tr>
<tr><td>प्र. सत्र</td><td>द्वि. सत्र</td><td>एकूण गुण</td><td>सरासरी</td><td>श्रेणी</td><td>प्रात्यक्षिक कार्य</td><td>लेखन कार्य</td><td>एकूण गुण</td><td>श्रेणी</td></tr>
<tr><td>१००</td><td>१००</td><td>२००</td><td>१००</td><td></td><td>५०</td><td>५०</td><td>१००</td><td></td></tr>
<tr><td colspan="5"></td><td colspan="4">अभ्यासक्रमावर आधारीत ५० गुणांचे लेखन कार्य पूर्ण करून घ्यावे.<br>प्रात्यक्षिक परीक्षेसाठी अभ्यासक्रमानुसार किमान १० घटकांपैकी किमान ०५ घटकांची निवड करावी.<br>दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक परीक्षा न घेता प्रात्यक्षिक कार्यावर आधारीत लेखन कार्य पूर्ण करुन घ्यावे व प्रचलित पद्धतीनुसार त्यांना श्रेणी (H) देण्यात यावी.</td></tr>
</table>

कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाची परिस्थिती पाहून- निर्धारित अभ्यासक्रम असलेल्या क्षमतांमध्ये साधार्म्य असलेल्या क्षमता वापरून मूल्यांकन करण्याचे स्वातंत्र्य शालेय स्तरावर राहील.

**मार्गदर्शक सूचना** - कमीत कमी विद्यार्थ्यांच्या बॅचेस करुन शारीरिक अंतर ठेवून गटागटाने प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात याव्यात. कॅामन साहित्याचा वापर टाळून वैयक्तिक स्वरुपाच्या क्षमता प्रात्यक्षिके घेण्यात यावीत. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रात्यक्षिक परीक्षेसाठी लागणारे शक्य होईल ते साहित्य विद्यार्थ्यांनी स्वतः आणण्याचा प्रयत्न करावा. उदा. स्किपिंग रोप, योगा मॅट/सतरंजी इ.